आकाशवाणी मुंबई

प्रादेशिक बातमीपत्र – दुपारी ३.०० वाजता

२३ सप्टेंबर २०२३ – शनिवार

खेळांप्रती दृष्टीकोनात दिवसोंदिवस बदल होत असून त्याचं प्रतिबिंब भारताच्या क्रीडा कामगिरीत पहायला मिळत असल्याचं प्रतिपादन प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी केलं आहे. उत्तरप्रदेशात वारणसी इथं आंतरराष्ट्रीय दर्जाच्या क्रिकेट स्टेडियमची पायाभरणी केल्यानंतर ते बोलत होते. क्रीडा क्षेत्रामार्फत देशाचे इतर देशांशी संबंध वृद्धिंगत होतात. क्रीडा क्षेत्रात भारतात विपुल गुणवत्ता असून, त्याला वाव देण्यासाठी केंद्रसरकार सर्वतोपरी प्रयत्न करत आहे, असं ते म्हणाले. स्टेडियम बांधलं की आसपासच्या परिसराचा आर्थिक विकास वेगाने होतो, असंही त्यांनी सांगितलं. उत्तरप्रदेशचे मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ आणि सुनील गावस्कर, कपिल देव, सचिन तेंडूलकर, रवीशास्त्री, मदनलाल असे दिग्गज क्रिकेटपटू कार्यक्रमाला उपस्थित होते.

**<><><><><><><>**

सायबर दहशतवाद आणि आर्थिक गैरव्यवहार रोखण्यासाठी जागतिक कायदेशीर चौकट तयार करण्याचं आवाहन प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी विधिज्ञांना केलं आहे.

नवी दिल्ली इथं आज सकाळी दोन दिवसांच्या आंतरराष्ट्रीय वकील परिषदेचं उद्घाटन करताना ते बोलत होते. सायबर दहशतवाद, आर्थिक गैरव्यवहार, कृत्रिम बुद्धिमत्तेचा गैरवापर या समस्यांना तोंड देण्यासाठी जागतिक चौकटीची गरज असून, हे एकट्या दुकट्या सरकारचं काम नसून, विविध देशांच्या कायदेतज्ज्ञांनी यासाठी  एकत्र येणं आवश्यक आहे, असं ते म्हणाले.

**<><><><><><><>**

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी उद्या सकाळी ११ वाजता आकाशवाणीच्या मन की बात या कार्यक्रमाद्वारे श्रोत्यांशी संवाद साधतील. प्रधानमंत्र्यांच्या मन की बात आकाशवाणी कार्यक्रमाचा  हा १०५ वा भाग आहे.

<><><><><><>

केंद्रीय गृहमंत्री अमित शहा आज एक दिवसाच्या मुंबई भेटीवर आले. थोड्याच वेळापूर्वी त्याचं आगमन झालं. या भेटीत ते लालबागचा राजा गणपती मंडळाला भेट देऊन गणपतीचं दर्शन घेतील आणि पूजाअर्चा करतील. वांद्रे इथल्या सार्वजनिक गणेश मंडळालाही ते भेट देतील अशी अपेक्षा आहे. मुंबई विद्यापीठाच्या फोर्ट इथल्या प्रांगणातल्या दीक्षांत सभागृहात आयोजित लक्ष्मणराव इनामदार स्मृति व्याख्यानाला सुद्धा ते संध्याकाळी उपस्थित राहतील.

<><><><><><>

**यवतमाळ** जिल्ह्यात ‘मेरी माटी, मेरा देश’ अर्थात माझी माती माझा देश अभियानाचा दुसरा टप्पा मोठ्या उत्साहात राबविण्यात येत आहे. याअंतर्गत प्रत्येक गावात ‘अमृत कलश यात्रा’ काढली जात असून, जिल्ह्यात आतापर्यंत 2 लाख 5 हजार कुटुंबांकडून माती, तांदुळचे संकलन करण्यात आले आहे.

**नाशिक** मध्येही  मेरी मिट्टी मेरा देश कार्यक्रम राबवण्यात येत आहे. नाशिक जिल्ह्याच्या उपमुख्य कार्यकारी अधिकारी डॉक्टर वर्षा फडोळ म्हणाल्या की,

**होल्ड बाईट...**

<><><><><><>

नागपूर आणि परिसरात काल रात्री दोन वाजता सुरू झालेल्या संततधार पावसामुळे शहराच्या सखल भागामध्ये मोठ्या प्रमाणात पाणी साचलं आहे. केवळ चार तासांत १०० मिलीमीटर पावसाची नोंद झाली अंबाझरी तलाव ओसंडून वाहत

असून जिल्हा आणि महानगर प्रशासनाचा आपत्ती व्यवस्थापन चमू कार्यरत आहे. आज सकाळीच जिल्हाधिकारी आणि महानगर पालिका आयुक्तांनी शहरातल्या अनेक भागांची पाहणी केली. शहरासह जिल्ह्यातील परिस्थितीवर आपत्ती व्यवस्थापन विभाग लक्ष ठेवून आहे.

<><><><><><>

नॅक मूल्यांकन करून न घेतलेल्या महाविद्यालयांवर राज्य शासनाच्या निर्देशाप्रमाणे कडक कारवाई होणार आहे. अशा महाविद्यालयांची यादी तयार करण्याचं काम पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ प्रशासनाकडून सुरू आहे.

<><><><><><>

महात्मा गांधी यांच्या जयंतीनिमित्त देशभरात राष्ट्रीय स्वच्छता दिन साजरा केला जातो. या पार्श्वभूमीवर मध्य रेल्वेनं स्वच्छता पंधरवडा अभियान हाती घेतलं आहे. हे अभियान १६ सप्टेंबर ते २ ऑक्टोबर दरम्यान मध्य रेल्वेच्या मुंबई, भुसावळ, नागपूर,पुणे आणि सोलापूर या विभागांत राबवलं जात आहे. या पंधरवड्यात ‘स्वच्छ रेल्वेगाडी’ ही मोहिम हाती घेतली आहे.

<><><><><><>

बीड जिल्ह्यातील आष्टी तालुक्यात गणेश मंडळासमोर लावलेल्या सजावट माळेचा शॉक लागल्यानं ९वर्षीय चिमुकल्याचा मृत्यू झाला. ही घटना शुक्रवारी रात्री ८ वाजेच्या सुमारास घडली. याप्रकरणी मंडप मालका विरोधात आष्टी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

//<><><><><><>//